# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

**परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुअ/पापुई/संशोधन/इ. १२ वी मूल्यमापन आराखडा/वेबसाईट/३७८९, दिनांक-०४/०९/२०२०.**

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एसडी-४, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०८ ऑगस्ट २०१९.
२) परिपत्रक क्रं.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.११वीची विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना/४२४१, दि.१६/०८/२०१९.
३) शासन पत्र क्र.संकीर्ण ०८२०/प्र.क्र.११६/एसडी-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०२ सप्टेंबर २०२०.

**विषय:** इ.१२ वीच्या PCBM गट ('भौतिकशास्त्र', 'रसायनशास्त्र', 'जीवशास्त्र'व 'गणित आणि संख्याशास्त्र')या विषयांचे सुधारित मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना इत्यादींबाबत.....

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, इयत्ता १२ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची व नवीन पाठयपुस्तकांची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच इयत्ता १२वी च्या PCBM गट ('भौतिकशास्त्र', 'रसायनशास्त्र', 'जीवशास्त्र' व 'गणित आणि संख्याशास्त्र') या विषयांच्या सुधारित मूल्यमापन योजनेची अंमलबजावणीही शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इयत्ता १२ वीची सुधारित मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आलेली आहे. मंडळाने विषयतज्ज्ञांमार्फत शासन निर्णयातील निर्देशानुसार तयार केलेली तपशीलवार मूल्यमापन योजना, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना यास संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या सुधारित मूल्यमापन योजना व तदनुषंगीक बाबींना अनुसरुन राज्य मंडळामार्फत विषयनिहाय **ऑनलाईनव्दारे** प्रशिक्षण नजीकच्या काळात आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात विषय शिक्षकांना विषयनिहाय मूल्यमापन आराखडे व अन्य तपशील अवगत करुन देण्यात येणार आहेत. उपरोक्तप्रमाणे शासन मान्यताप्राप्त इ.१२ वीचे मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना या परिपत्रकासह मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलबध करुन देण्यात आलेली आहे.

२....

वरील सर्व सूचना आपल्या विभागातील मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळां/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयाव्यात. सदर परिपत्रकात दर्शविलेल्या मूल्यमापन आराखड्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आदेशान्वये.

**(डॉ. अशोक भोसले)**
**सचिव**
**राज्यमंडळ, पुणे ०४**

**प्रति,**

विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण विभागीय मंडळ- पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, रत्नागिरी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविदयालये/उच्च माध्यमिक शाळा प्रमुखांना त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -:**

१) मा.शिक्षण संचालक(माधमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, पुणे.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
३) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद.
४) शिक्षण निरिक्षक, उत्तर/दक्षिण/पश्चिम, मुंबई.
५) गणकयंत्र विभाग व सर्व संबंधित शाखा, राज्य मंडळ, पुणे.

**प्रत माहितीसाठी सादर:**

१) मा.सहसचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१.
३) मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (विदया प्राधिकरण), सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- ४११०३०.
४) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती), सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४.

* * *